महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृह शाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. मा राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांचेकडील मुळ अर्ज क्रमांक 249/2020, दिनांक 09/11/2020 रोजीचे आदेश
5. मा सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक एमपीसीबी/जेडी (एपीसी) टीबी-बी/201110-एफटीएस-0001, दिनांक 09/11/2020
6. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र संकीर्ण-2017/प्रक्र 23/म-8, दिनांक 12/11/2020
7. विस्फोटक अधिनियम, 2008
8. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-04/कावि/2020/531, दिनांक 12 नोव्हेंबर, 2020

---0000---

क्र दंडप्र-04/कावि/2020/552 दिनांक 22 डिसेंबर, 2020

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद या कार्यालयाचे आदेश दिनांक 12 नोव्हेंबर, 2020 अन्वये मा राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांचेकडील दिनांक 09/11/2020 रोजीच्या आदेशात दिलेल्या निर्देशानुसार कोविड-19 विषाणूच्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर हवा प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी जळगांव शहर महानगरपालिका हद्दीकरीता दिपावली सणाच्या कालावधीत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत केवळ रात्री 08.00 ते रात्री 10.00 या वेळेतच फटाके वाजवणे - फोडण्यास परवानगी देण्यात आलेली होती.

त्याअर्थी, मी, **अभिजीत राऊत,** जिल्हादंडाधिकारी **जळगांव** मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मा राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांचेकडील दिनांक 09/11/2020 रोजीच्या आदेशात दिलेल्या निर्देशानुसार **कोविड-19 विषाणूच्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर हवा प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी जळगांव शहर** महानगरपालिका **हद्दीकरीता** खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**" दिनांक 25 डिसेंबर, 2020 रोजी ख्रिसमस व नववर्ष स्वागत दिनांक 31 डिसेंबर, 2020 या उत्सवांच्या कालावधीत जळगांव शहर** महानगरपालिका **हद्दीत केवळ रात्री 08.00 ते रात्री 10.00 या वेळेतच फटाके वाजवणे - फोडण्यास परवानगी असेल."**

सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन केले जात असल्याबाबत तपासणी करण्याचे अधिकार पोलीस विभाग व जळगांव महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना प्रदान करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 51 ते 60 तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 22/12/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

**(अभिजीत राऊत)**
जिल्हादंडाधिकारी, **जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपविभागीय दंडाधिकारी सर्व / कार्यकारी दंडाधिकारी सर्व
5. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
6. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
7. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.